ISSN 2320-6128

# Indian Thinker

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief

**Arun B. Godam**

Vol I Issue VI, Year III ( Half Yearly) Aug. 2015 to Jan. 2016

Editorial Office :

Khedgaon Road, Kapil
Nagar, Latur, Dist. Latur
413512 (M.S.) India.

Contact :-

Arun B. Godam

8149668999, 8483959442

E-mail :

hitechresearch11@gmail.com.

Shaurya Publication,

Latur

Price : Rs. 250/-

EXECUTIVE EDITORS

Dr. Hanumant Mane
R.Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

Dr. N.J. Waghmare
Res. Guide & Head,Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P.)

Dr. U.T. Gaikwad
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

Dr U.V.Panchal
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Pro. S.B. Karande
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

Dr M.U. Yusuf
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

DEPUTY-EDITORS

B.J. Hirve
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

S.M. Bansode
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalay
Sarud, Tq, Shahuwadi, Dist
Kolhapur

Maimanat Jahan Ara
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Dr. B.T. Lahane
Principal, Head, Dept. of Eng
Sambhajirao Kendre Colleg
Jalkot, Dist. Latur (M.S.)

INDIAN THINKER

Half yearly Research Journal

ISSN - 2319- 8648

Vol I Issue VI, Aug. 2015 to Jan. 2016



# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | A New Species Of Genus Tylocephalum Hiwarensis From Marine Water Fish, Trigon Zugei (Muller And Henle, ) | S.V. KAKADE | 6-11 |
| 2 | Herbal plants used as a cosmetics with special reference to skin care | B.J. Hirwe | 12-15 |
| 3 | Radio Frequency Identification Technology for Libraries | Vaishali M. Choudhari | 16-21 |
| 4 | Land Acquisition and Compensation issues of special Economic zone in India | Trupti Shivajirao Thorat | 22-29 |
| 5 | Studies Of Glycogencontent In Circumoncobothrium Madanensis N.Sp . | S.V. Kakade | 30-32 |
| 6 | मानवाधिकार संरक्षण के क्षेत्र में गैर सरकारी संगठनों की भूमिका | माघव शिंदे | 33-36 |
| 7 | स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी लोकसंख्या | डॉ.गोविंद राजाराम परडे | 37-42 |
| 8 | महाराष्ट्रातील लोकसंगीत : गोंधळ : परंपरा व विकास | प्रा. जाधव अनिल संतराम | 43-47 |
| 9 | वृत्तपत्राच्या पाठपुराव्यामुळे मिळाले मराठवाडयाच्या हक्काचे २५ टीएमसी पाणी | सतीश मुधुकरराव महामुनी, | 48-53 |
| 10 | महिला आणि सामाजिक न्याय | प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव | 54-59 |
| 11 | भारतातील अण्वीक शस्त्राविरोधी चळवळ | प्रा. सौ. बोडके पी.आर | 60-63 |
| 12 | मांजरा प्रकल्पातील बदतल्या पीकरचनेचा अभ्यास | प्रा. बोबडे बी.बी.<br>डॉ. पिसाळ एच.जी. | 64-66 |
| 13 | पती - पत्नी नात्याचे बदलते रंग | प्रा.डॉ. वनिता उदगीरकर | 67-69 |

ISSN - 2319-8648
INDIAN THINKER
Vol I Issue VI, Aug. 2015 to Jan. 2016
54
Half yearly Research Journal

# महिला आणि सामाजिक न्याय

प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

10 Research Paper - Political Science

सामाजिक न्याय भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय शासन व प्रशासनाची वाटचाल सामाजिक न्याय पुर्तीच्या दिशेने राहिली आहे. सामाजिक न्यायाला कॅंद्रबिंदु मानुनच अनेक योजना व कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. 70 वर्षात भारताची वाटचाल विकसित देशाच्या दिशेने होत आहे. परंतु या 70 वर्षात देशात खरंच सामाजिक न्यायाची स्थापना झाली का ? सामाजिक न्यायाच्या स्थापनेत प्रत्येक घटकाने योग्य योगदान दिले का ? सामाजिक न्यायाचा प्रकाश सर्वांच्या घरापर्यंत गेला का? विशेषत: जो वर्ग या देशातील लोकसंख्येचा अर्धा भाग आहे. तसेच सामाजिक न्यायाच्या धोरणाचा फायदा उचलणाऱ्यात अर्धा आहे. त्या महिलाप्रती खरंच आम्ही सामाजिक न्यायाची भूमिका घेतली का ? याचे उत्तर जर होय असेल तर या महिलांनी पुढे येवून सामाजिक न्यायाचा हात धरुन स्वत:चा विकास करुन घेतला का ? हा प्रश्न निर्माण होतो. याशिवाय या देशातील महिलांचे सामाजिक न्यायाच्या संरक्षण व स्थापनेतील नेमके योगदान आहे का ? असेल तर त्यास पुरुषप्रधान समाज व शासन मान्य करतो का ? सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेत पुरुषांचे योगदान श्रेष्ठ का महिलांचे ? हा ही प्रश्न यानिमित्ताने उभा रहातो.

या शोध निबंधात सामाजिक न्यायाची बुज राखून लोकशाहीत्मक वातावरण निर्माण करण्यात महिलांच्या भुमिकांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. तो करताना ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा आधार घेतला. सामाजिक न्यायाच्या संरक्षणात महिलांची भूमिका महत्वाची आहे. परंतु त्यांनाच सामाजिक न्याय मिळाला नाही हे गृहितक आधारभुत समजून विश्लेषण करण्यात आले.

स्वातंत्र्यानंतरच्या आर्थिक विकास कार्यक्रम व धोरणांचा फायदा समाजातील सर्वच वर्गापर्यंत थोडया अधिक प्रमाणात पोहचला. परंतु या सर्वाचा अधिक फायदा काही विशिष्ट राजकीय घराणे, व्यापारी व उद्योगपतीपर्यंतच पोहचला. या सर्वापासून काही दूर या देशातील एक फार मोठा वर्ग आहे. ज्याला आपण महिला या संज्ञेखाली व्यक्त करतो. स्वातंत्र्यानंतर महिलांच्या स्थतीत सुधारणा झाली का ? या प्रश्नांचे उत्तर होय असेच येईल. परंतु अपेक्षेनुसार व महिला सबलकरणाच्या प्रदीर्घ इतिहास नुसार नाही. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या क्षेत्रात महिलांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. बालविवाह, हुंडाबळी, कौटूंबिक हिंसाचार, कुपोषण, शिक्षण व आरोग्य सुविधांचा अभाव, रोजगाराच्या मर्यादित संधी कामाप्रमाणे पगार न मिळणे, कामाच्या ठिकाणी शारिरीक शोषण ईत्यादीमुळे महिलांच्या मुलभूत व लोकशाही अधिकारांचे

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VI, Aug. 2015 to Jan. 2016

ात. तसेच देशाच्या सामाजिक न्यायाधिष्ठित संतुलीत व सर्वांगिण विकासावर नकारात्मक परिणाम होतो. स्वातंत्र्यानंतरही न 1/3 लोकसंख्या (महिला) अनेक समस्यांची उदा.भुकबळी व कुपोषणाची शिकार आहे. योग्य व वेळेवर अन्न ा, बाल विवाह आणि निकृष्ठ दर्जाच्या आरोग्य सुविधामुळे भारतात माता व शिशु मृत्यूदराचे प्रमाण अधिक आहे. ण्याचे पाणी व शौचालयासारख्या किमान सुविधापासून महिला एकविसाव्या शतकात वंचित आहेत यास अनेक आहेत. दिवसेंदिवस भारताची आर्थिक क्षेत्रातील प्रगती सुधारत आहे. परंतु सामाजिक विकासात पिछेहाट होत आहे. तः महिलांच्या बाबतीतील स्थिती अतिशय चिंताजनक आहे. तलाक हा शब्द तिनवेळा उच्चारुन घटस्फोट मिळणाऱ्या ांची संख्या वाढत आहे. महिलाकडे उपभोगाची वस्तु म्हणून बघण्याच्या दृष्टिकोन नवभांडवली व्यवस्थेने अधिक दृढ . सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, महिलांना आर्थिक अधिकार देणे, आर्थिक क्षेत्रात काम करण्याची संधी व सुरक्षितता दिल्याने महिलांचा सर्वसमावेशक विकासातील वाटा वाढेल.सुजलाम सुफलाम भारताचे स्वप्न साकार न. महिला सबलीकरणाची संकल्पना व्यवहारात रुजेल.

भारतास स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा भारतापुढे अनेक प्रश्न होते. या सर्व प्रश्नांना समर्थपणे सोडविण्यास पुरक यघटनेची निर्मिती करण्यात आली. या राज्यघटनेतून राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, आर्थिक व सामाजिक विकासाचे श स्पष्ट केले. या उद्देशपुर्तीच्या दिशेने जाण्यासाठी भारत शासनाने अनेक संस्था, संघटना,कायदे, कार्यक्रम व धोरणाची मती केली. वाढती लोकसंख्या, मर्यादित संसाधने, आधारभुत संरचनाचा अभाव, मागास शेती व उद्योग, अकुशल व शिक्षित नोकरवर्ग इंत्यादी समस्या भारतापुढे स्वातंत्र्यानंतर होत्या, आजही आहेत. या समस्यांना सोडवण्यासाठी नियोजनबंध्द यक्रम व धोरणांची आखणी करण्यासाठी योजना आयोग, राष्ट्रीय विकास परिषद, मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार ना. समाजवादी समाजरचनेच्या स्थापनेचे ध्येय बाळगण्यात आले. एवढे चांगले धोरण, कार्यक्रम व विचारसरणी असूनही रतात सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाचे युग अवतरले नाही. कारण वरील सर्व कार्यक्रम व योजनांच्या मलबजावणीत झालेली तफावत. तद्रनंतर स्विकारण्यात आलेले धोरण व विकासाच्या प्रारुपाची अंमलबजावणी करताना ालेला गोंधळ, यामुळे त्यांचा फायदा समाजातील सर्वसामान्य वर्गासह इतरांना न होता समाजातील विशिष्ट वर्गालाच झ ना. समाजातील आदिवासी,दलित, वृध्द,बालक, महिला हे सर्व विकासापासून दुर राहिले.

1990 नंतरच्या भांडवली अर्थव्यवस्थेने विकासाच्या दरीतील विषमता अधिक वाढवली यामुळेच भारतीय ासन व प्रशासनाने 1990 नंतर सामाजिक न्याय व सर्वसमावेशक विकासाच्या धोरणावर अधिक भर दिला. ज्यामुळे शातील कमकुवत वर्ग, ग्रामीण भाग, आदिवासी आणि महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जावू लागेले. सर्वांचाच माज व संतुलित विकास होईल यावर भर देण्यात आला.

भारतीय राज्यघटनेतून सर्वांनाच समान अधिकार व संधी देण्यात आल्या. पुरुषाप्रमाणेच महिलांनाही सामाजिक, र्मिक व आर्थिक क्षेत्रात अधिक संधी व सशक्त करण्यावर भर देण्यात आला. तरीही 70 वर्षांत महिलांच्या दर्जा व थतीत सुधारणा झाली नाही. या देशातील अनेक महिला कौटुंबिक हिंसा, कुपोषण, कामानुसार वेतन न मिळणे,

आरोग्य व शिक्षणाच्या प्रश्नाने ग्रासलेल्या आहेत. दिवसागणिक गुन्हेगारी, बलात्कार, हुंडाबळी व पतीपीडित महिलांच्या संख्येत वाढ होत आहे. महिलांचा सामाजिक, कौटुंबिक दर्जा व स्थिति खालावत आहे. कारण भारतीय सामाजातील तृसत्ताक समाजव्यवस्था, कौटुंबिक किंवा सामाजिक व राजकीय जीवनातील महत्वपुर्ण निर्णयातील महिलांची नगन्य

ISSN - 2319-8648
Vol I Issue VI, Aug 2015 to Jan 2016

भुमिका, कमकुवत आर्थिक स्थिती ईत्यादीमुळे महिलांचा सर्वांगिण विकास होत नाही. क्षमता व गुणवत असूनही [illegible] न्याय मिळत नाही.

भारतासारख्या विकसनशील देशात वयाच्या 15 वर्षांपर्यंत मुलींना विवाह व आरोग्याची व्यवस्थित माहिती मिळत नाही. देशातील अनेक प्रगतशील राज्यात महिला कुपोषणाच्या बळी आहेत. महिलांची कुपोषणातून मुक्तता व्हावी म्हणून सर्वांगीण बाल विकास योजना लागू करण्यात आली. परंतु वाढता भ्रष्टाचार आणि योजनांच्या अंमलबजावणीतील लालफित व दप्तर दिरंगाईमुळे ती यशस्वी झाली नाही व अपेक्षित परिणाम मिळाले नाहीत. तसेच या समस्येला सोडविण्यासाठी केद्र शासनाने खाद्य सुरक्षा योजना बनवली. या योजनेत गर्भवती महिला आणि बालकांना जन्मानंतरही दोन वर्षांपर्यंत दर महिन्याला पाच किलो अतिरिक्त खाद्यअन्न देण्याची सोय केली. याशिवाय अपत्याच्या पालन पोषणासाठी सहा महिन्यापर्यंत दरमहा एक हजार रुपये देण्याची तरतूद करण्यात आली. यातरतुदीबाबत समस्या अशी आहे की, यातून मिळणारा एक हजार रुपये पुरुषच घेतात. पुरुष आपले उत्पन्न तंबाखू, सिगरेट,दारु इत्यादी नशाजन्य वस्तुवर खर्च करतात. त्यामुळे नगदी पैसे न देता खाद्यान्न देण्याचीच तरतुद योग्य आहे. याशिवाय या योजनेसाठी तयार करण्यात आलेल्या सार्वजनिक वितरण प्रणालीस दुरुस्त करण्याची गरज आहे. कुपोषणासोबतच महिलांच्या जिवनात आरोग्याच्या समस्या गंभीर आहेत. भारतात एकुण उत्पन्नाच्या फार कमी खर्च आरोग्यावर होतो.

सर्वांनाच आरोग्यासंबंधी माहिती नसते. प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. आरोग्य क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार, बालवयातील मुलींचे लग्न यामुळे विकासाचे निश्चित ध्येय गाठता येत नाही. बालमृत्यूचे प्रमाण वाढत आहे. यात मृत्यू दर अधिक आहे. जागरुकतेचा अभाव, शिक्षणाचा अभाव, कायदयाची योग्य पध्दतीने अंमलबजावणी न होण्यामुळे बालविवाहाची परंपरा सुरु आहे. स्वच्छतेचा अभाव हे ही आरोग्याच्या समस्येचे एक कारण आहे. यामुळेच नरेंद्र मोदींनी स्वच्छ भारत अभियान राबवले .

2011 च्या जनगणनेनुसार भारतात आजही जवळपास 07 लाख लोक डोक्यावर शौच उलचण्याचे काम करतात. यात बऱ्याच प्रमाणात महिला आहे. 2012 साली केंद्रीय मंत्रिमंडळाने हाथाने शौच उचलणाऱ्या कामाचा निषेध आणि त्यांचे पुनर्वसन विधेयकात दुरुस्ती केली.

2011 च्या जगणनेनुसार 53.1% घरात शेचालयाच्या सुविधा नाहीत. 2022 पर्यंत ग्रामीण भागातील घरात शंभर टक्के शौचालय बनवण्याचे ध्येय ठेवले. खुल्यावर शौचालय करणे महिलांसाठी असुरक्षित अपमानजनम व मानवतेचा दर्जा नाकारल्यासारखे आहे.

स्वच्छता आणि शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता झाल्यास स्वस्थ समाज आणि महिलाही सशक्त बनतील. युनोच्या 2011 मानव विकास अहवालानुसार पाणी व स्वच्छतेची सुविधा दिल्यामुळे महिलांच्या आरोग्य विशेषतः प्रजनन सुधारणा होते. जे मानवीय प्रतिभा, आत्मविचारास आणि शारिरीक सुरक्षेसाठी महत्वपुर्ण आहे.

भारतातील विकासाचे भ्रष्ट मॉडेल व दोषयुक्त धोरणामुळे सामाजिक न्याय व सर्वांगीण विकासाची कल्पना अशक्य आहे. समाजात महिलांना योग्य सन्मान देणे, हिंसेपासून संरक्षण करणे व आरोग्य इत्यादीचा क्षेत्रात अधिक सुविधा दयावा. महिलांच्या आर्थिक गरजा पुर्ण न झाल्यामुळे हिंसा व अत्याचार वाढतात. परिणामतः बालविवाह व वेश्यावृत्तीत महिला जातात. वर्तमानातील आर्थिक जगतात महिलांना अनेक प्रकारच्या विषमतांचा सामना करावा लागत आहे. उदा :

...गात कमी प्रतिनिधित्व, कामानुरुप वेतन न मिळणे, घरातील संपत्तीत अधिकार न देणे, महिलांच्या कार्यास ...महत्व न देणे, प्रतिकुल परिस्थितीत कार्य करायला लावणे व महिला विकासास प्राधान्य देणाऱ्या धोरणांचा ... राजकीय) अभाव ई. आज बऱ्याच महिला असंघटित क्षेत्रात काम करतात उदा.शेती, बांधकाम इत्यादी. ...अर्थव्यवस्थेत त्यांचे महत्वाचे योगदान आहे. परंतु असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना कायद्याचे पाठबळ ...ांचे कामाचे तास निश्चित नाहीत. बऱ्याच संस्थात महिलांना रात्रीच्यावेळी काम करण्यापासून रोखले जात नाही. ...पुरुषासमान वेतन मिळत नाही. शासनामार्फत बनवलेल्या धोरणाचा त्यांना फायदा होत नाही. त्यांना अस्थिर व ...च्या वातावरणात काम करावे लागेल. जागतिकीरणातील अर्थव्यवस्थेत सामाजिक उपक्रमावर होणारा खर्च ...वस्थेतील अनावश्यक बोझा मानले. त्यामुळे असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलासह इतरांना सामाजिक सुरक्षा ...मिळाली नाही.

भारतातील महिलांनी आज प्रत्येक क्षेत्र व्यापाले आहे. महिला काम करत नाहीत असे एकही क्षेत्र नसेल यासर्वात ...य महिला सर्वात अधिक शेतीत काम करते. ग्रामीण भागातील एकुण कामगाराच्या प्रमाणात अधिक पमाणात महिलांचे ...असतात. कमी उत्पन्न, अनियमीत रोजगार व निम्न सामाजिक दर्जामुळे या क्षेत्रात महिलांचे शोषण होते. परंतु रोजगाराचा ...व व पर्याय नसल्यामुळे महिलांना मजबुरीने या क्षेत्रात काम करावे लागते. भारतीय लोकसंख्येच्या 52 % लोकसंख्या ...वर अवलंबून आहे. 77% व्यक्ति खेडयातच राहतात. याउलट कृषी विकास दर 2.4 % आहे. शेतीचा विकास न झ... ...ामुळे सामाजिक न्याय व सर्वांगीण विकासाचे ध्येय गाठता येत नाही. ग्रामीण भागातील लोक शहराकडे जात आहेत. ...गार व उत्पन्नाचे साधन शोधण्यासाठी घरातील पुरुष शहराकडे जातो. परिणामतः कुटूंब पशुपालन व शेतीची निगा ...ण्याचे दायित्व महिलावर येते. शेतीचे नुकसानीत जाणे महिलांना सामाजिक न्यायापासून व विकासापासून दूर लोटल्यासारखे ...हे.

पर्यावरणाचा असंतुलितपणा व नैसर्गिक संसाधनाचा दुरुपयोगाने महिलांची स्थिती अधिक खालावली. पाणी,चारा जळणाच्या शोधातच महिलांना कोसोदुरची पायपीट करावी लागते. शेतीवर अवलंबून राहणाऱ्या महिलाचे उत्पन्न कमी ...सते. या कमी उत्पन्नातच त्यांना आपल्या कुटूंब व बालकांचे पालन पोषण करावे लागते. मनरेगा या केंद्र शासनाच्या ...जगार निर्माण करुन देणाऱ्या महत्वपुर्ण योजनेत महिला सबलीकरणास विशेष महत्व दिले. महिलांना अधिकाधिक ...जगार देवून त्यांच्या आर्थिक स्थितीत व परिणामतः सामाजिक प्रतिष्ठेत सुधारणा करण्याचा प्रयत्न या योजनेने केला या ...ार्यक्रमाची उपलब्धि नसती तर ग्रामीण भागातील महिलामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढले असते. सामाजिक न्याय निर्माण ...ाला नसताच.

या योजनेतून महिलांची जी आर्थिक प्राप्ती झाली त्यातून त्यांनी भुकेचा प्रश्न मिटवला स्वतःचे लहान-सहन कर्ज ...चुकवले मुलांचे शिक्षण व स्वतःच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर अधिक खर्च केला. या योजनांचा महिलांना अधिक फायदा ...व्हावा म्हणून त्यांना कौटूंबिक जबाबदारी सांभाळणे, मुलांचे पालन, पोषण करण्यासाठीचा वेळ देवून त्यांच्या कामाच्या ...ामात लवचिकता आणावी लागेल. त्यामुळे त्यांना मनरेगातील काम व कुटूंब यांच्यात समन्वय स्थापन करता येईल. तसेच ...मनरेगातील कार्यरत अधिकारी वर्गात महिलांचे प्रमाण वाढवावे लागेल. अलिकडील काळात शिक्षण व रोजगाराच्या क्षेत्रात ...महिलांचे प्रमाण वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान,इंजिनिअरिंग, संगणक,विज्ञान, विमानसेवा,

पत्रकारिता,प्रशासकीय अधिकारी या क्षेत्रात महिलांचा प्रवेश व सहभाग वाढत आहे. परंतु काम करण्याच्या (कुटूंब व सार्वजनिक) ठिकाणी महिलांचे शारिरीक शोषण, छेडछाड ईत्यादी बाबी महिलांची आर्थिक प्रगती व सामाजिक सुरक्षिततेच्या मार्गात अधिक त्रासदायक ठरत आहेत. विशेषत: बहुराष्ट्रीय कंपन्या व मॉलमध्ये महिलांच्या शारिरीक शोषणाचे प्रमाण वाढत आहे. महिलाप्रती हिंसा व मानवी हक्काचे उल्लंघन वाढत आहे. त्यामुळे न्यायालयासह इतर अनेक संस्थानी काम करणाऱ्या महिलांना शारिरीक शोषणापासून वाचवण्यासाठी केंद्र व राज्यांना अनेक निर्देश दिले. परंतु व्यवहारात याकडे दुर्लक्ष

झाल्याचे दिसते. अनेक महिला आपल्याला झालेल्या त्रासाची तक्रार करत नाहीत. अनेक कंपन्यात त्यांच्या त्रासाची नोंद घेणारी स्वतंत्र यंत्रणा नाही. ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणीच्या यंत्रणेचे काम समाधानकारक नाही. महिलावरच तक्रार करु नये केली असेल तर ती माघार घेण्याबाबत दबाव टाकला जातो. तसे न केल्यास कामावरुन काढून टाकणे, बदनामी करणे, ॲसिड फेकणे, अपमानित करण्याचे प्रयत्न होतात. त्यामुळे त्यांना राज्यघटनेचे राज्य असणाऱ्या लोकशाही देशात जीवन जगण्याच्या मुलभूत अधिकाराला मुकावे लागते.

जागतिकीरणामुळे राज्याच्या कार्य भुमिका व स्वरुपात आमुलाग्र बदल केला. आज राज्याची भुमिका हस्तक्षेपकाची नसून आपल्या नागरीकांना सक्षम व समर्थ बनवण्याची बनली आहे. त्यामुळेच राज्याची सामाजिक कल्याणाच्या क्षेत्रातील गुंतवणूक दिवसेंदिवस कमी होत आहे.

याचा प्रत्यक्ष परिणाम महिलांवर झाला. कारण राज्यशासन शिक्षण व आरोग्यात गुंतवणूक करत नाही. त्यामुळे महिलांची त्या क्षेत्रातील संधी हिसकावली जाते. परिणामत:वाढते प्रजनन व कुपोषणासारख्या समस्यांना त्यांना सोसावे लागते. अलिकडील शिक्षणाचे प्रमाण पाहता मुलींच्या शिक्षणात वाढ होत आहे.परंतु शासनाकडून शालेय, विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणासाठी ज्या योजना व सुविधा दिल्या जातात. त्याचा सर्वात जास्त त्रास व असुरक्षितता मुलींना होते. यामुळे बऱ्याच मुली शाळा व महाविद्यालयात येत नाहीत. ज्या येतात त्यांच्यात सातत्य नसते. कांही अध्यार्वरच शिक्षण सोडून निघून जातात.

या देशात महिलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे, त्यांना आरोग्यविषयक सुविधा उपलबध व्हाव्यात म्हणून अनेक प्रयत्न होत आहेत. परंतु पायाभुत सेवा सुविधा, कुशल व ज्ञानी मनुष्यबळाच्या अभावामुळे शासनाचे महिलांच्या सामाजिक न्यायाशी संबंधित उपक्रम अयशस्वी होतात. भारतात आरोग्याचा व शिक्षणाचा प्रश्न चिंताजनक आहे. याचे एक कारण असेही सांगता येईल की, शासन व प्रशासनात महिलांचा नगण्य सहभाग आहे. कारण ज्या ठिकाणी महिलाशी संबंधित धोरण व निर्णय घेतले जातात. अनेक कार्यक्रम व धोरणाची अंमलबजावणी होते. याठिकाणी महिलांचे प्रतिनिधीत्व आवश्यक आहे. कुटूंब, प्रजनन, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, मुलांचे पालन-पोषण ईत्यादी ठिकाणी महिलांचे सक्रिय व सकारात्मक योगदान असते. त्यामुळे शासकीय योजना, अंदाजपत्रक, कार्यक्रम लिंगाधारित बनवावीत, संपत्ती संबंधीच्या कायद्यात दुरुस्त्या कराव्यात, लिंगाधारीत भेदभावास नष्ट करावे.

प्रत्येक ठिकाणी काम करणाऱ्या महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन द्यावे. देश कोणताही असो तेथील लोकसंख्येत महिलांचे प्रमाण अर्धे असते. त्यांच्या सक्रिय सहभाग व योगदानाशिवाय देशाचा जी.डी.पी. व शाश्वत विकास साधता येत नाही. त्यामुळे देशाअंतर्गत विकास व विकासशील उपक्रमात महिलांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. या

ISSN - 2319-8648
Vol I Issue VI, Aug. 2015 to Jan. 2016

ाला अधिक वाढवण्यासाठी संधीची समानता, गुणवत्तेचा आदर व महिला म्हणून त्यांचा सन्मान करणे गरजेचे आहे. ा देशात घटनाकर्त्यांना अपेक्षित सामाजिक न्याय निर्माण होईल. महिलांनाही माणूस म्हणून जगण्याची व विकसित ी संधी देणेच सामाजिक न्याय व लोकशाहीच्या यशस्वीतेची पहिली अट आहे.

सामाजिक न्यायाची स्थापना करण्याची जबाबदारी या देशातील प्रत्येक नागरीकांची आहे. पंरतु प्रत्येक नागरीक ापले योगदान देतो का ? याचे उत्तर नाहीच असे दयावे लागेल. विशेषत: ज्यांच्याकडे सामाजिक न्यायाचे संरक्षण व ूक करण्याची जबाबदारी राज्यघटना, शासन, प्रशासन व समाजाने दिली.

त्या वर्गातील पुरुष व महिलांच्या योगदानाचा अभ्यास करता समोर येणारे चित्र वेगळेच असेल. जे या देशात जिक न्यायाचे संरक्षण करण्यात पुरुषी मानसिकतेला दोषी ठरणारे असेल तर महिलाकडील सहनशीलता, शोषिकता,संयम द्गुणांना सामाजिक न्यायाच्या संरक्षणात अधिक गुण देवून जाईल. याचा अर्थ असाही नाही की, सर्व स्त्री व पुरुष ाजिक न्यायाचे रक्षणकर्ते व हणनकर्ते असतात. पुरुषातही पुरुषी मानसिकता असते असे नाही ती स्त्रियातही असते. दरीत समाजिक न्यायाची निर्मिती ही सामुहिक जबाबदारी आहे. या सामुहिक जबाबदारीत सर्वांचाच हातभार लागावा. ी हाथ बढाना साथी रे एक एकेला थक जाए तो मिलकर हाथ बढाना साथी रे या गाण्याप्रमाणे या देशातील प्रत्येक घटकाने लांना न्याय, सन्मानजनक वागणूक देण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न करावे. नुसता बोलघेवडेपणा व भंपकबाजीच्या ावर मानवी मुल्य जोपासता येत नसतात त्यात मानवतेची झालर असणाऱ्या कृतीशीलतेची जोड असावी लागते. अशा ारे स्त्री प्रधान व्यवस्था निर्माण करण्याच्या विचाराला कृतिशीलतेची जोड देण्याचा अट्टाहास व निर्धारच सामाजिक ायास पोषक व प्रेरक वातावरण निर्माण करु शकतो.

## संदर्भ सूची

1) The Indian Journal of Political Science - April - June 2014
Editor : C.P. Barthwal

2) न्याय म्हणजे काय ? संपादक - प्रा.नागोराव कुंभार प्रबोधन प्रकाशन -लातूर - 1988

3) झोत- सामाजिक न्यायावर - संपादक - उत्तम कांबळे

4) महिला सक्षमीकरण : स्वरुप आणि विकास-संपादक - प्रा.पांडुरंग
मुद्दे : अरुणा प्रकाशन लातूर- 2016

5) संपूर्ण महिला व बालविकास के सागर - डॉ. प्राजक्ता टांकसाळे, प्रा. शिशिकांत अन्नदाते.